महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ, जि. ठाणे - ४२१ ५०१.
Government Medical College, Ambernath, Dist. Thane - 421 501.
Email id :- deangmcambernath@gmail.com
अधिष्ठाता कार्यालयाचा पत्ता (तात्पुरता) :- १ ला मजला, प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, नवीन प्रशासकीय भवन, नगर परिषद, अंबरनाथ (प.). ४२१ ५०१.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# जाहिरात

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ या संस्थेकरीता महाविद्यालयीन वापरासाठी एकुण 5324 चौ.मी. पेक्षा जास्त चटई क्षेत्र असलेली इमारत शासन मान्यतेच्या अधिन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मूल्यांकनानुसार भाडे तत्वावर घेणे आहे. सदर इमारत भाड्याने घेण्यासाठी खालील अटींची पुर्तता होण्याची आवश्यकता आहे.

1. इमारत कै. डॉ. बी. जी. छाया उपजिल्हा रुग्णालय, अंबरनाथ पासून 6 कि. मी.च्या आतील अंतरावर असणे आवश्यक आहे.
2. सदर इमारतीत 210 चौ.मी.चे आठ हॉल, 168 चौ.मी.चे चार हॉल, 120 चौ.मी चे आठ हॉल व 100 चौ.मी.चे दोन हॉल असणे आवश्यक आहे.
3. सदर इमारतीत किमान 100 विद्यार्थी प्रवेशासाठी आवश्यक राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांची पूर्तता करण्याजोगे कक्ष उपलब्ध असणे आवश्यक आहे.

तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबरनाथ् या संस्थेकरिता किमान 50 मुलांच्या व 50 मुलीच्या वसतिगृहासाठी व अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासस्थानासाठी लागणाऱ्या इमारती, शासन मान्यतेच्या अधिन राहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुल्यांकनानुसार भाडेतत्वावर घेणे आहे.

तरी इच्छुक मालक व्यक्ती / संस्थांनी मालकीहक्कांची कागदपत्रे, बांधकाम आराखडा, इमारतीचा पत्ता, खोल्याची संख्या, उपलब्ध सोयी, सुविधा, फर्निचर, प्रांगण, इमारत व आतील फोटोसह ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून दि.26.09.2024 या कालावधी पर्यत deangmcambernath@gmail.com या ईमेलवर अर्ज सादर करावा. तसेच याबाबतची आवश्यक कागदपत्रे, अटी व शर्तीची यादी संचालनालयाच्या **www.med-edu.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. दि.26.09.2024 नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**सदरील भाडे तत्वावरील इमारत उपलब्ध करुन देण्यासंबंधी अटी व शर्ती इत्यादी बाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.**

**इमारतींबाबतची आवश्यक कागदपत्रे :-**

1. इमारतीच्या जागेचा 7/12 उतारा. (सद्यस्थितीतील)
2. बांधकाम कामपुर्णत्वाचा दाखला/भोगवटा प्रमाणपत्र (नगरपालिका/महानगरपालिका/ग्रामपंचायत).
3. इमारतीचा मंजूर प्लॅन.
4. इमारतीचा फोटो.
5. इमारतीचे सद्यस्थितीतील विद्युत देयक.

**अटी व शर्ती**

1. सदरील इमारतीमध्ये नियमित पुरेशा प्रमाणात शुद्ध पिण्याचे, वापरण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची व्यवस्था असावी.
2. विद्युत पुरवठ्याची पूर्ण व्यवस्था असावी.
3. इमारतीच्या समोर वाहनांच्या पार्किंगसाठी पुरेशी जागा असावी.
4. इमारत कै. डॉ. बी. जी. छाया उपजिल्हा रुग्णालय, अंबरनाथ पासून 6 कि. मी.च्या आतील अंतरावर असणे आवश्यक आहे.
5. इमारत 03 वर्षे व त्यानंतर आवश्यक असल्यास वाढीव कालावधीकरिता कराराने भाडेतत्वावर घेण्यात येईल.
6. पाणीपट्टी, घरपट्टी व इतर अनुषंगिक कर भरण्याची जबाबदारी हि इमारत मालकाची राहिल.
7. इमारत ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासून पुढे ताब्यात असलेल्या खोल्यामधील विद्युत वापराच्या देयकाचा भरणा या संस्थेकडून करण्यात येईल.
8. इमारतीचे बांधकाम महाविद्यालयाच्या महाविद्यालयीन व वसतिगृहाकरिता वापरायोग्य असावे.
9. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने इमारत पुर्णता सुरक्षित, संरचानात्मक परिक्षण व अग्निप्रतिबंधक उपाययोजना केलेली असावी.
10. इमारतीचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित/निश्चित केल्याप्रमाणे शासकीय नियमानुसार अदा करण्यात येईल.

11. सदर इमारतीत किमान 100 विद्यार्थी प्रवेशासाठी आवश्यक राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांची पूर्तता करण्याजोगे कक्ष उपलब्ध असणे आवश्यक आहे.
12. सदर इमारतीत 210 चौ.मी.चे आठ हॉल, 168 चौ.मी.चे चार हॉल, 120 चौ.मी चे आठ हॉल व 100 चौ.मी.चे दोन हॉल असणे आवश्यक आहे.
13. इमारतीमध्ये लहान व मोठी दुरुस्तीचे कामे तसेच नुतनीकरण करण्याची जबाबदारी इमारत मालकाची राहिल व त्याकरिताचा खर्च इमारत मालकास स्वत: करावा लागेल व त्याची प्रतिपूर्ती या कार्यालयाकडून होणार नाही.
14. इमारतीचे भाडे शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतरच इमारत मालकास अदा करण्यात येईल.
15. संस्थास्तरावर गठित केलेल्या संमितीद्वारे इमारतीची संपूर्ण पाहीणी करुन समितीच्या अहवालानुसार इमारत भाडयाने घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.
16. इमारत भाडयाने घेण्यासंबंधीचे आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा कोणत्याही वेळी रद्द करण्याचे तसेच जाहीरात रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी स्वत: कडे राखुन ठेवले आहेत.

सही/-
**(डॉ. संतोष जी. वर्मा)**
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
अंबरनाथ, जि. ठाणे.